VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २९. आत्मनिर्भर भारत, वस्तुस्थिती, संधी आणि आव्हाने

**प्रा. डॉ. सीमा चव्हाण**
सहाय्यक प्राध्यापिका, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, जि. पुणे.
**विकास गोधाजी अंत्रे**
संशोधन विद्यार्थी, रा. ब. बोरावके श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

प्रस्तावना

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत हे अभियान पाच वर्षांपूर्वी हाती घेतलंय. आत्मनिर्भर भारत याचा अर्थ खरा सगळ्यांनी समजून घ्यायला हवा. आत्म निर्भर म्हणजे आपला भारत देश पूर्णपणे स्वत:च्या बळावर उभा राहू शकतो अशी ताकद भारताला बनवणे. आत्मनिर्भरता आर्थिक संदर्भात म्हणजे संकुचितता, सुरक्षितता, सदैव स्वदेशी, जागतिकीकरणाकडे पाठ फिरवणे याला मी सध्याच्या युगात आत्मनिर्भर म्हणणार नाही. आत्मनिर्भर म्हणजे जिथे जिथे आपण इतर देशांवर अवलंबून आहोत, मग ते आयातीसाठी असो, परदेशी गुंतवणुकीसाठी असो, त्याच्यावर अवलंबून असतानाही आपण आपले उद्योग, आपल्या सेवा अधिकाधिक कार्यक्षम आणि जागतिक दर्जाच्या करणं, याला मी आत्मनिर्भर म्हणतो. जगात असा एकही देश आढळणार नाही, ज्याची आर्थिक समृद्धी आणि श्रीमंती हे फक्त त्याच देशातील उद्योगांना प्रमोट करून झाली आहे. थोडक्यात आत्मनिर्भरता म्हणजे देशांतील साधनांचा पुरेपूर वापर करून घेणे हा आहे. यात परदेशी सहाय्य नको ही भूमिका नसून, सरसकट परदेशी मालावर अवलंबित्व नको ही भूमिका आहे. जागतिक पातळीवर एकमेकांच्या सहकार्याने धोरण निश्चिती करून सगळ्याच देशांनी आपापले भले करून घ्यावे आणि एकमेकांच्या हिताला जाणीवपूर्वक बाधा न पोहचवता आपले हितसंबंध सुदृढ करावेत, अशी जागतिकीकरणाची व्यवस्था मागील शतकात रूढ झाली. पण एकविसाव्या शतकामध्ये त्यात काही महत्त्वाचे बदल होत आहेत. जगभर स्वत:च्या देशापुरता विचार करणारी नवी विचारधारा बलवत्तर होऊ लागली आहे. ती लक्षात घेता अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत आपण पूर्वीच आत्मनिर्भर झालो आहोत, पण ऊर्जा, पाणी, संरक्षण उत्पादन, तंत्रज्ञान, औषधनिर्माण... अशा अनेक क्षेत्रात आपण आणखी आत्मनिर्भर होण्याची गरज आहे. त्यासाठी स-कुशल मनुष्यबळ निर्माण करावे लागेल. आत्मनिर्भर अभियान सुरू करून आता पाच वर्षे होत आली. त्यात कोविडमुळे झालेल्या लॉकडाऊनमुळे अर्थव्यवस्थेची मोठी पडझड झाली. कोविडच्या धक्क्यातून भारत सावरत नाही, तोच चीनने आपल्या भूभागावर केलेल्या अतिक्रमणामुळे नवे आंतरराष्ट्रीय संकट निर्माण झाले. या सर्व परिस्थितीत भारताला आत्मनिर्भर होण्याशिवाय पर्याय नाही. देशाला आत्मनिर्भरता प्राप्त करण्यासाठी काय अडचणी आहेत, त्या कशा सोडविता येतील, या दृष्टीने आत्मनिर्भर भारत, वस्तुस्थिती, संधी आणि आव्हाने, या रिसर्च पेपरच्या माध्यमातून अडचणी मांडून त्यावर उपाय



Scanned with CamScanner

सुचविले आहेत. कृषी, बँकिंग, डिजिटल इंडिया, आंतरराष्ट्रीय व्यापार या अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्राचे वास्तव, संधी आणि आव्हाने याचे अवलोकन या पेपरच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

उद्दीष्टे

1. भारतीय अर्थव्यवस्था आत्मनिर्भर होण्यातील अडचणींचा अभ्यास केला आहे.
2. कृषी, बँकिंग, डिजिटल इंडिया, आंतरराष्ट्रीय व्यापार या क्षेत्रातील वास्तव व संधी अभ्यासल्या आहेत.
3. संशोधनाअंती भारत आत्मनिर्भर होण्यासाठी उपाय सुचविले आहेत.

माहितीचे स्त्रोत

प्राथमिक स्त्रोत, यात कृषी, बँकिंग, डिजिटल इंडिया अभियान यातील तज्ज्ञ अभ्यासक, शासकीय अधिकारी, अर्थशास्त्राचे अभ्यासक यांच्याशी मुलाखतीदद्वारे चर्चा करून माहिती मिळवली.

दुय्यम स्त्रोत, अर्थशास्त्राशी निगडित वृत्तपत्रे, मासिके, पुस्तके यातून माहिती मिळविली.

अभ्यास विषयाचे विश्लेषण

भारताला आत्मनिर्भर करायचे असेल, तर शेती, उदयोग, बँकिंग, डिजिटल इंडिया, सेवा आदी अर्थव्यवस्थेच्या उपक्षेत्रांचा विकास होणे गरजेचे आहे. परंतु आजपर्यंत स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतरही अनेक उत्पादनांत आपण आत्मनिर्भर होऊ शकलो नाही. आत्मनिर्भर होणे म्हणजे फक्त स्वदेशीचा नारा देणे नव्हे, तर ज्ञान, तंत्रज्ञान आत्मसात करून आपल्या देशातील साधन सामुग्रीचा उपयोग करणे होय. हा करताना कृषी, उद्योग, सेवा आदी क्षेत्रांत अनेक अडचणी आहेत. त्यावर काय उपाय योजता येईल, याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे :

कृषी

भारतीय शेतीमध्ये आत्मनिर्भर होण्यासाठी प्रचंड पोटेन्शिअल आहे. परंतु शेती आत्मनिर्भर होण्यासाठी शेतीमध्ये नवीन ज्ञान, तंत्रज्ञान व गुंतवणूक करावी लागेल. ती करण्यासाठी येणाऱ्या अडचणी समजून घ्याव्या लागतील. देशाच्या एकूण जी.डी.पी. पैकी १६ टक्के जी.डी.पी. कृषी क्षेत्रातून येतो. परंतु या १६ टक्के जी.डी.पी.साठी ५५ टक्के म्हणजे तीन पट मनुष्यबळ राबतं. त्यामुळे भारतात शेतकरी आत्महत्या वाढताहेत. त्या थांबवायच्या असतील, शेतीचे तीन मूलभूत प्रश्न समजून घ्या. आज शेती अडचणीत यायला कारणीभूत असलेली सर्वात महत्वाची समस्या म्हणजे देशातील शेतीविरोधी कायदे. कमाल जमीनधारणा कायद्याने शेतीचे आजमितीला इतके लहान-लहान तुकडे झाले आहेत की, अशी तुकड्या तुकड्यात वाटलेली जमीन स्वतःच अनुत्पादक झाली आहे. जगात जपान, भारत आणि फिलिपाईन्स हे तीन देश असे आहेत की, ज्यांच्यातील शेतीचे किमान क्षेत्र एक हेक्टरच्या खाली आले आहे. इतके कमी क्षेत्र एका कुटुंबाचे सोडा. एका व्यक्तीचाही चरितार्थ चालू शकत नाही. छोट्या क्षेत्रामुळे पैसा आणि श्रम वाचविणारी टेक्नॉलॉजी शेतकरी वापरू शकत नाही.

दुसरा प्रश्न शेतीतील टेक्नॉलॉजी विरोधाचा. काँग्रेस आणि भाजप या दोघांनीही केंद्रात सत्तेत असताना शेतीत येणाऱ्या टेक्नॉलॉजीला आलटून पालटून विरोधच केला आहे. एकीकडे देश टेक्नोसॅव्ही झाल्याच्या गप्पा मारायच्या अन् दुसरीकडे पेस्टिसाईड्स व इन्सेक्टिसाईड्स उत्पादक लॉबीला जपण्यासाठी बीटीसारखे तंत्रज्ञान



१०२

भारतात येवू द्यायचे नाही. या सत्ताधारी आणि विरोधकांच्या दुतोंडी भूमिकेमुळे शेतीचे सर्वात जास्त नुकसान झाले आहे. आपल्या शेजारच्या बांगलादेशाने बीटी तंत्रज्ञानाचा स्वीकार केला. त्यामुळे आपली शेती गाळात असताना आज बांगलादेशच्या शेती विकासाचा दर आठ टक्क्यापेक्षा जास्त आहे. (सध्या आपल्या शेती विकासाचा दर मायनसमध्ये आहे.) बांगलादेशने शेतीत जागतिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्याने हा देश आशियातील 'फास्टेस्ट ग्रोईंग इकोनॉमी' बनला आहे. याउलट तंत्रज्ञान नाकारल्याने आधीच शेतजमीन कमी, त्यात प्रतिहेक्टर उत्पन्नाचा खर्च जास्त आणि मिळणारा भाव मातीमोल या दुष्टचक्रात आपली शेती अडकली आहे.

शेवटचा तिसरा प्रश्न आवश्यक वस्तू अधिनियम कायदा. हा कायदा देशात बनविला गेला तेव्हा कृषी उत्पादन कमी होते. खाणारी तोंडे जास्त होती. त्यामुळे तेव्हा तो गरजेचा होता. आता परिस्थिती बदलली. लोकसंख्या वाढत असली तरी कृषी उत्पादन कमालीचं वाढलं आहे. सरकारी गोदामात अन्नधान्य ठेवण्याच्या अपुऱ्या सुविधेमुळे ते सडतंय. अशा परिस्थितीत हा कायदा शेतकऱ्यांसाठी कर्दनकाळ ठरतो आहे. अलीकडे केंद्र सरकारने हा कायदा रद्द केला असला, तरी त्याची अंमलबजावणी केलेली नाही. या तीन प्रश्नांव्यतिरिक्त 'मिनीमम सपोर्ट प्राईज' देण्याचं नाटक शासन करतंय. पण यातील वास्तव फार गंभीर आहे. देशात उत्पादित होणाऱ्या १०० टक्के कृषिमालापैकी अवघ्या आठ टक्के कृषिमालाला शासन हमीभाव देवू शकते. ९२ टक्के कृषिमालाची खरेदी शासन करू शकत नाही. बाजार समित्या शेतकऱ्यांपेक्षा व्यापारी व माथाड्यांचेच भले करतात. मग शेतकऱ्यांच्या पदरात हमीभाव पडणार कसा. हे शेतीचे खरे प्रश्न सोडविले, तर शेतीमध्ये गुंतवणूक वाढेल. करार शेतीच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा वापर वाढेल. तेव्हाच भारतीय शेती व शेतकरी खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर होऊ शकेल.

बँकिंग

प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था हा त्या देशाचा कणा असतो आणि त्या देशाची बँकिंग व्यवस्था किती सबळ आहे, यावर त्या देशाची अर्थव्यवस्था किती सशक्त आहे, हे लक्षात येते. बँकिंग क्षेत्र आत्मनिर्भर करायचे असेल, तर यातील मुख्य अडचणी समजून घ्याव्या लागतील. आपल्या बँकिंगची सर्वात मोठी व्यथा म्हणजे अनुत्पादक कर्जांचे वाढते वाटप. या वाटपामुळे बुडीत कर्जांचे प्रमाण वाढते आहे. २०१५ मध्ये भारतीय बँकांची अनुत्पादक कर्जे ही २ लाख ७८ हजार कोटी रुपयांवरून वाढून २०१७ पर्यंत ७ लाख ३४ हजार कोटी रुपयांवर गेली आहेत. तब्बल अडीच पट या रकमेत वाढ झाली आहे. त्यामुळे भारत हा पिग्जच्या यादीत जाऊन बसला आहे. म्हणजे बुडीत कर्जाच्या बाबतीत पोर्तुगाल, आयर्लंड, ग्रीस, स्पेन आणि त्यानंतर पाचवा क्रमांक भारताचा लागतो. भारताच्या बँकिंगवर ही परिस्थिती का ओढावली? याचे उत्तर या व्यवसायातील कर्त्या माणसांनी बँकिंग व्यवसायाचे नीतिशास्त्र पायदळी तुडविण्यात सापडेल. बँकांनी मोठमोठ्या उद्योग-व्यवसायांना कर्ज देणे आणि यापैकी काही अनुत्पादित (एनपीए) होणे. त्यामुळे बँकिंगचे आर्थिक आरोग्य बिघडणे हे भारतीय बँकिंगला नवे नाही. आजवर राष्ट्रीयीकृत बँका बुडीत कर्जाच्या शिकार होतात, म्हणून त्यांच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवले जायचे. परंतु, अलिकडे एनपीएचे छोटे-मोठे डोंगर करण्यात खासगी बँकाही मागे नाहीत. (येस बँकेत जे काही घडले, त्यामुळे त्याची तीव्रता किती गंभीर आहे हे लक्षात यावे) सहकारी व छोट्या बँकादेखील या महाविकाराने त्रस्त आहेत. हे सार्वत्रिक दुखणे संपूर्ण अर्थव्यवस्थेला

खिळखिळे करते. बँकांना केवळ सरकारच्या मदतीवर अवलंबून राहून चालणार नाही. तर त्यांच्या कार्यात सुधारणा करून योग्य कर्जवाटप, चोख वसुली याचे रोल मॉडेल निर्माण करून स्वत:ची आर्थिक पत सिद्ध करावी लागेल. बुडीत कर्जाचा परिघ वेळीच मर्यादित केला नाही, तर एका एका उद्योगाला गिळंकृत करीत तो संपूर्ण अर्थव्यवस्थेलाच पोखरेल. ही सायकल क्रॅक करण्यासाठी कॉर्पोरेट लँडिंगची गुणवत्ता, नियमन, नियंत्रण काटेकोरपणे आपल्या बँकिंगला पाळावे लागेल. नोटबंदीनंतर भारतीय बँकिंगमध्ये ऑनलाईन ट्रान्झॅक्शन वाढले होते. परंतु नंतर ऑनलाईन ट्रॅन्झॅक्शनचा दर मंदावला. तो वाढवायचा असेल, तर सरकारला कॅशलेस इंडिया अभियान जाणीवपूर्वक पुन्हा राबवावे लागेल. आधार कार्ड, बँक अकाउंटला जोडल्यामुळे कुठल्याही व्यक्तीची आर्थिक पत, एका क्लिकवर पाहाणे शासनाला सोपे झाले आहे. बँकिंग आत्मनिर्भर करायचे असेल, तर शासनाला बँका चालविणे ही सरकारी बँका चालविण्यामागची भूमिका सोडावी लागेल. त्याऐवजी कर्जदाराच्या गरजेनुसार रेट ऑफ इंटरेस्ट ठरवून कर्जवाटपाची प्रक्रिया जास्तीत जास्त डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणणे गरजेचे आहे. देशात कायद्याने सावकारी बंद असली, तरी भारतीय शेतीला सर्वात जास्त पतपुरवठा सावकरी कर्जातून होतो. हे धक्कादायक वास्तव स्वीकारून सावकारी करणाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत कसे बसवता येईल. अशा छोट्या परंतु अर्थव्यवस्थेच्या पतपुरवठ्यावर मोठा परिणाम करणाऱ्या प्रश्नांवर शासनाने काम करणे गरजेचे आहे. तरच भारतीय बँकिंग आत्मनिर्भर होऊ शकेल.

**डिजिटल इंडिया**

देशातील प्रशासनात लोकांचा सहभाग वाढवणे. ते अधिक पारदर्शी बनवणे, शासनाकडून लोकांना मिळणारा प्रतिसाद वाढवणे व ते अधिक लोकाभिमुख करणे अशा उद्देशांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने १ जुलै २०१८ रोजी देशात 'डिजिटल इंडिया' अभियानाची सुरुवात केली. परंतु हे अभियान राबविताना डिजिटल व्यवहार आणि सेवा क्षेत्राचा होत असलेला विस्तार. हा केवढा मोठा आणि सर्वव्यापी बदल आहे. याचे सुरवातीस अनेकांना पुरेसे आकलन झाले नाही, डिजिटल आर्थिक व्यवहार आणि बँकिंगमध्ये होणारे बदल हे केवळ मोजक्या श्रीमंत लोकांसाठीच आहेत, असे सुरुवातीला बोलले गेले तसेच डिजिटल व्यवहारांचा फायदा तंत्रकौशल्य जाणणाऱ्या मूठभर नागरिकांनाच होणार आहे, असा दावा करण्यात आला मात्र डिजिटल व्यवहारातील सुरवातीचे अडथळे बऱ्याच प्रमाणात दूर झाल्यामुळे डिजिटल व्यवहारांचा सुखद अनुभव सध्या आपल्या देशातील सर्वसामान्य नागरिकही घेऊ लागले आहेत. स्मार्ट फोन परवडत नाही, इंटरनेटची स्पीड सर्वत्र चांगली मिळत नाही, त्यामुळे काही ग्रामीण आणि दुर्गम भागात अजूनही बँकिंग आणि डिजिटल व्यवहार करताना नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे पण एवढ्या मोठ्या देशात या प्रकारच्या सुधारणा टप्प्याटप्प्याने होणार. हे गृहीत धरले पाहिजे. अर्थात, सर्वाधिक स्मार्टफोन वापरणारा भारत जगातला दुसरा देश ठरला आहे, हेही विसरता येणार नाही. पंधरा वर्षांपूर्वी इंटरनेटचा होणारा वापर आणि मोबाइल कनेक्टिव्हिटीची स्थिती आठवून पाहिले तर आपण कोठून कोठे आलो आहोत. हे लक्षात येते. शिवाय ते सर्व इतके महाग होते की ते सर्वसामान्य भारतीयांना परवडत नव्हते. आता जगाच्या तुलनेत भारतात डेटा सर्वात स्वस्त झाला असून अनेकांच्या तो आवाक्यात आला आहे. नोटबंदीच्या



102

आधी आणि नंतर डिजिटल व्यवहारात होणाऱ्या त्रासाविषयीची चर्चा आठवल्यास आता अनेक ठिकाणी होणारे डिजिटल व्यवहार इतक्या सहजपणे होऊ शकतात याचा सुखद धक्का बसतो. सरकारने चार वर्षांपूर्वी आणलेली पंतप्रधान जनधन योजना, त्यानंतर आधार कार्ड काढण्याविषयीची मोहीम आणि ह्या दोघांची जोडणी. यामुळे सर्व लाभधारकाच्या थेट बँक खात्यात मदत पोचविणे शक्य झाले आहे. डिजिटल व्यापार, बँकिंग, एज्युकेशन यात आव्हानेही आहेत. इंटरनेटचा विस्तार : इंटरनेटचा वापर करणाऱ्यांमध्ये चीन आणि अमेरिकेनंतर भारताचा क्रमांक तिसरा आहे, पण २०२० म्हणजे मागील वर्षाअखेर केवळ ६० टक्के लोकसंख्याच इंटरनेटशी जोडली गेली असल्याचे दिसून आले. स्पीड : इंटरनेटचा स्पीड हा एक महत्त्वाचा मुद आहे. टेलिकॉम कंपन्यांजवळ स्पेक्ट्रमची संख्या कमी असल्याने व्हाइस कॉलिंगमध्ये समस्या येऊ शकतात. अशा परिस्थितीत डाटा ट्रान्सफरसाठी ५ एमबीपीएस वेगाची जागतिक सरासरी गाठणे अवघड आहे. अमेरिकेत तर ब्रॉडबँडसाठी २५ एमबीपीएस स्पीड अनिवार्य करण्याची मागणी होत आहे. ग्रामीण विरुद्ध शहरी : शिक्षण व्यवस्थेत ग्रामीण क्षेत्रात बदलाची गरज अधिक आहे; पण गावांमध्ये डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर शहराच्या तुलनेत बरेच कमजोर आहे. यामुळेच देशाच्या ग्रामीण भागात इंटरनेटचा वापर करणारी लोकसंख्या फक्त २३ टक्के आहे. हे टाळण्यासाठी समान पातळीवर मूलभूत सुविधांचा विकास हे तत्त्व राबवले गेले पाहिजे. या अडचणी सोडविण्याबरोबर शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातही डिजिटल साक्षरता राबविणे गरजेचे आहे. हे केले तरच फक्त डिजिटल इंडिया नव्हे तर भारतही डिजिटल होऊ शकेल.

आंतरराष्ट्रीय व्यापार

कुठल्याही देशाच्या स्वतःच्या गरजा भागविल्या, तर तो देश निर्यात करू शकेल. या आघाडीवर भारताची वाटचाल समजून घ्यावी लागेल. वास्तविक देश आत्मनिर्भर अथवा स्वयंपूर्ण होणे, ही विकासाची निरंतर प्रक्रिया असते. गेल्या सत्तर वर्षांत स्कूटर, मोटारसायकल, मोटार. अवजड ट्रक, ट्रॅक्टर, प्रवासी बस, रेल्वे इंजिन व रेल्वे डबे, पोलाद, सिमेंट, शेती उद्योगात संकरित बियाणे, कीटकनाशके, खते, रसायने, विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात उपग्रह, कम्प्युटर, सुपर कम्प्युटर, क्रायोजनिक इंजिन, मोबाइल, दूरसंचार सेवा, चित्रपटनिर्मिती, माहिती व तंत्रज्ञान आयटी उद्योग अशा अनेक क्षेत्रांमध्ये आपला देश नक्कीच आत्मनिर्भर म्हणजेच स्वयंपूर्ण झाला आहे. सैन्य दलाबाबतही 'तेजस' लढाऊ विमान, 'चेतक' हेलिकॉप्टर, वैजयंता रणगाडा, शक्तिमान ट्रक, रडार यंत्रणा, विविध अंतरावरून मारा करणारी संहारक क्षेपणास्त्रे व अनेक प्रकारची छोटी शस्त्रे यांमध्येही गेल्या सत्तर वर्षांत देश आत्मनिर्भर झालेला दिसून येतो. अजूनही अनेक क्षेत्रांमध्ये आपण आत्मनिर्भर व्हायला हवे, हे निश्चित. मात्र, जगातील कोणताही देश शंभर टक्के आत्मनिर्भर अथवा स्वयंपूर्ण कधीच बनू शकत नाही. आजही आपला देश खनिज तेल, सोने, अत्याधुनिक लष्करी साहित्य, विमानवाहू युद्धनौका, सुखोई अथवा राफेलसारखी अत्याधुनिक लढाऊ विमाने अणुशक्तीवर चालणारी पाणबुडी, विविध प्रकारच्या औषधांसाठी आवश्यक रसायने, इलेक्ट्रॉनिक भाग अशा अनेक वस्तूंची आयात करीत आहे. या क्षेत्रातही आपण आत्मनिर्भर व्हावे, असे आपल्याला जरूर वाटते. मात्र, त्यातील मर्यादादेखील आपण समजून घेतल्या पाहिजेत. आपल्या देशात खनिज तेल खूप कमी असल्यामुळे सुमारे ८० टक्के खनिज तेलाची आपण आयात करतो व त्यापासून रॉकेल, पेट्रोल, डिझेल आणि विमानासाठीचे



13

Scanned with CamScanner

पेट्रोल तयार करतो. देशात सोन्याच्या खाणी आहेत. मात्र, त्याचे उत्पादन अत्यल्प आहे आणि भारतीयांची मानसिकता सोन्याच्या दागिन्यांकडे मोठ्या प्रमाणावर झुकली असल्यामुळे जगातून सोनेदेखील आपण मोठ्या प्रमाणात आयात करतो. याचाच अर्थ इच्छा असूनही प्रत्येक क्षेत्रात आपण आत्मनिर्भर होऊ शकत नाही. याबरोबरच सरसकट विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकून चालणार नाही. कारण आपण निर्यात करीत असलेल्या वस्तूंवरही परदेशात बहिष्कार टाकला जाण्याची शक्यता असते. मागील वर्षी कोणत्या देशांकडून कोणत्या वस्तूंची आयात आपण केली, हे पाहणे उद्बोधक ठरेल. गेल्या वर्षी भारताने ४८० अब्ज अमेरिकी डॉलरची आयात केली होती. २०१५च्या तुलनेत यामध्ये २२.८ टक्के वाढ झाली आहे. या एकूण आयातीपैकी ६०.९ टक्के आयात ही आशिया खंडातील देशांमधून झाली आहे. युरोपीय देशांकडून १५.९ टक्के, अमेरिकेकडून ९.२ टक्के, आफ्रिकेकडून ८.१ टक्के; तसेच लॅटिन अमेरिकी देशांमधून ३.४ टक्के असे प्रमाण आपल्या आयातीचे आहे. या माहितीवरून लक्षात येते, की अनेक बाबींची आयात आवश्यक आहे. तसेच, काही बाबींमध्ये देशातील उत्पादने पुरेशी होत नसल्यानेदेखील आयात करावी लागत असते. या आकडेवारीवरून लक्षात येते की, अनेक बाबतीत आपला देश आत्मनिर्भर झाला, तरी शंभर टक्के आत्मनिर्भर होऊ शकत नाही व त्यामुळेच अब्जावधी रुपयांची आयात करणे आपल्याला भाग पडते. अर्थात, आपल्याकडे उपलब्ध नसल्यामुळे आयात कराव्या लागलेल्या बाबींमुळे देशाला कमीपणा येत नसतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर घडून आलेल्या हरितक्रांतीमुळे आपण तेव्हा अन्नधान्यांच्या बाबतीत बहुतांशी स्वयंपूर्ण झालो होतो. आज भारत अन्नधान्याच्या बाबतीत तांदूळ आणि गहू वगळता अजिबात स्वयंपूर्ण नाही. डाळी तेलबिया यांच्या बाबतीत स्वयंपूर्णतेची ही परिस्थिती नाही. एकीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्या, पिकाला भाव न मिळणे हे गंभीर प्रश्न, तर दुसऱ्या बाजूला कृषी उत्पादनाची करावी लागणारी आयात, अशा कचाट्यात आपली अर्थव्यवस्था आहे. त्यासोबतच सेवाक्षेत्राचा अर्थव्यवस्थेतील वाटा वाढतोच आहे. वाढत्या सेवा क्षेत्राला कारखानदारी क्षेत्राची जोड मिळणार नाही. आणि भारतही आंतरराष्ट्रीय व्यापारात आत्मनिर्भर होणार नाही.

**निष्कर्ष**

1. तंत्रज्ञानाचा अभाव, तुकडे झालेले क्षेत्र, शेतीविषयक जाचक कायदे, कृषी क्षेत्राच्या आत्मनिर्भरतेतील प्रमुख अडथळे आहेत.
2. भारतीय बँकांचे अनुत्पादक कर्जवाटप वाढले आहे.
3. डिजिटल इंडिया अभियानाला शहरी लोकांचा प्रतिसाद जास्त आहे.
4. ग्रामीण भागात डिजिटल प्लॅटफॉर्मची उपलब्धता पोहोचलेली नाही.
5. भारताची इलेक्ट्रॉनिक, कम्प्युटर, टेलिकम्युनिकेशन क्षेत्रातील निर्यात कमी आहे.
6. शेतीत तंत्रज्ञानाचा स्वीकार, तुकडेबंदी कायदा करणे, आवश्यक वस्तु अधिनियम या कायद्याच्या दुरुस्तीची प्रभावी अंमलबजावणी केल्याशिवाय भारतीय कृषीक्षेत्र आत्मनिर्भर होणार नाही.
7. बँकांनी प्रत्येक वेळी सरकारी मदतीवर विसंबून राहाण्यापेक्षा योग्य कर्जवाटप, चोख वसुली, बँकिंग साक्षरता याचे रोल मॉडेल तयार करणे आवश्यक आहे.



Scanned with CamScanner

8. कॅशलेस ट्रान्झॅक्शन वाढविण्यासाठी ग्रामीण जनतेला डिजिटल साक्षर करण्यासाठी बँकांनी पुढाकार घ्यावा.

9. डिजिटल इंडिया अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागात इंटरनेट ॲक्सेस वाढवावा लागेल.

10. डाळीची आयात कमी करण्यासाठी डाळ उत्पादन भारतीय शेतीला वाढवावे लागेल.

11. सोने, खनिज तेल, नैसर्गिक वायूच्या उत्पादन व निर्यातीत नैसर्गिक मर्यादेमुळे भारत इच्छी असुनही आत्मनिर्भर होऊ शकत नाही.

## संदर्भसूची

1. शेतकरी मासिक (जानेवारी २०१९), प्रकाशक महाराष्ट्र शासन, मुंबई
2. बळीराजा मासिक (ऑगस्ट २०१८), प्रकाशक बळीराजा प्रकाशन, पुणे
3. लोकराज्य नियतकालिक (मार्च २०२०), प्रकाशक महाराष्ट्र शासन, मुंबई
4. अर्थपूर्ण मासिक (नोव्हेंबर २०२०), प्रकाशक अर्थक्रांती प्रतिष्ठान, पुणे
5. दिनेश शर्मा (मार्च २०२० ते ऑक्टोबर २०२०) यांचे कृषी अर्थशास्त्रावरील ब्लॉग
6. पंतप्रधान कार्यालय, डिजिटल इंडिया अहवाल (सप्टेंबर २०१९)
7. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ गिरीष वासुदेव यांची महाराष्ट्र टाईम्समध्ये अर्थभान लेखमालिका
8. इंपोर्ट-एक्स्पोर्ट विभाग, भारत सरकार, अहवाल २०१९